दिवाणी दावा क्रं. ५३/२०१२
गजेंद्र वि. हायटेक
निशाणी - २९

**वादीतर्फे साक्षीदार क्रं.- ०१**

शपथपत्रातील मजकुर माझे सांगण्याप्रमाणे लिहीलेला असुन तो मजकुर बरोबर व खरा आहे व त्यावर माझी सही आहे.

**सरतपासणी ॲड. एस.के.लिखीते - वादीतर्फे**

१. मी व प्रतिवादीमध्ये दि.०९.८.२००४ रोजी झालेला करारनामा केसकामी दाखल केला असुन त्यावर माझी व प्रतिवादी यांची सही आहे, त्यातील मजकुर बरोबर असुन तो करारनामा निशाणी ३४ वर आहे. माझेमध्ये व नारायण पांडे यांच्यात दि.१२.०९.२००६ रोजी एक मेमोरॅंडम ऑफ अंडरस्टॅंडीग या नावाचा दस्त तयार करण्यात आला असुन त्यावर माझी व प्रतिवादी क्रं.२ यांची सही असुन त्यातील मजकुर बरोबर आहे, त्याला निशाणी ३५ देण्यात येत आहे. मी दि.३०.०६.२००६ रोजी ॲड. पंकज गुप्ता यांच्यामार्फत रजिष्टर नोटीस पाठविली होती त्याची स्थळप्रत मी अभिलेखावर दाखल केली असुन त्यातील मजकुर बरोबर आहे, तो नोटीस निशाणी ३६ वर आहे. मी पोष्टाची पावती अभिलेखावर दाखल केलेली असुन ती निशाणी क्रं.३७ वर आहे. सदर नोटीस नारायण पांडे यांना मिळाली याबाबत पोष्टाची पोचपावती दाखल केली असुन ती निशाणी ३८ वर आहे. मी दि.१५.०९.२००८ रोजी प्रतिवादी क्रं.१ यांना प्रतिवादी क्रं.२ मार्फत रजिष्टर नोटीस पाठविला होता, त्याची स्थ्ळप्रत अभिलेखावर दाखल केली असुन त्यातील मजकुर बरोबर व खरा असुन ती नोटीस निशाणी ३९ आहे. त्याची पोष्टाची पावती निशाणी ४० वर आहे. तसेच दि.१५.०९.२००८ रोजी पाठविलेल्या नोटीसला उत्तर देण्यात आले होते ती निशाणी ४१ वर आहे.

**<u>उलटतपासणी – ॲड. बी.के.पोंगडे प्रतिवादीतर्फे</u>**

२. प्रतिवादींच्या वकीलांच्या तोंडी विनंतीवरून उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब करण्यात आला.

वा. दा. ब. अ. क. केले माझे समक्ष

**(ए.व्ही.पंडीत)**
सहदिवाणी न्याया.क.स्तर, उमरेड
दि. ०६.११.२०१७

**(ए.व्ही.पंडीत)**
सहदिवाणी न्याया.क.स्तर, उमरेड
दि. ०६.११.२०१७.